महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
मादाम माका मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुख्य इमारत, १ ला मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
Email ID: -doj1.rfd@maharashtra.gov.in

क्रमांक:-जमीन-२०२३/प्र.क्र.१९७/ज-१ दिनांक:- १५ जून, २०२३

प्रती,

जिल्हाधिकारी (सर्व)

**विषय:**- शासनाने वर्ग-२ धारणाधिकारावर आणि भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या शासकीय जमिनीचे वर्ग ०१ मध्ये रुपांतरण करण्याच्या प्रस्तावाबाबत.

**संदर्भ:**-१) मा. मंत्री (महसूल) यांचे क्र/ मंत्री/ व्हिआयपी/ म.प.दु.वि./ १४४०/ २०२३, दि. ०७ जून, २०२३ चे पत्र
२) शासन अधिसूचना दि. ०८ मार्च, २०१९ तसेच दि. २७ मार्च, २०२३

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ आणि त्याखालील महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या शासकीय जमिनीचे भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतर करणे) नियम, २०१९ या मधील तरतुदी अन्वये शासनाने प्रदान केलेल्या जमिनीचे भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरण करतांना रुपांतरण अधिमूल्याची रक्कम रुपये १ कोटी पेक्षा अधिक आहे, अशा प्रकरणी (जमीन प्रदान केलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्था वगळून) रुपांतरण करण्यापूर्वी शासनाची पूर्व मान्यता घेण्याची तरतूद दि. २७ मार्च, २०२३ रोजीच्या अधिसूचने अन्वये करण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीत भोगवटादार वर्ग-२ तसेच भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या शासकीय जमिनीचे भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरण करण्याबाबतची प्रकरणे विभागीय आयुक्त यांचेमार्फत शासनाकडे सादर करण्यात येतात.

प्रशासकीय गतिमानता आणण्याच्या दृष्टिकोनातून सादरी करणाचे टप्पे कमी करण्याच्या हेतूने वर नमूद केल्यानुसार रुपये १ कोटीपेक्षा अधिक रुपांतरण अधिमूल्य असलेली प्रकरणे (सहकारी गृहनिर्माण संस्था वगळून) आणि शर्तभंग असलेली प्रकरणे विभागीय आयुक्त यांच्यामार्फत सादर न करता थेट शासनास सादर करावीत.

(सुहास ममदापूरकर)
**अवर सचिव, महसूल व वन विभाग**

**प्रत :-**

विभागीय आयुक्त (सर्व)